महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मधील कलम (३) अनुसार अधिसूचित केलेल्या शालेय शिक्षण विभागाच्या पाच योजना राज्य शासनाच्या DBT portal वर घेण्याबाबत---

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक:- DBT -२०१७ /प्र.क्र.२२/एसडी-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक :- २१ सप्टेंबर, २०१७

वाचा :-

१) महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.
२) शालेय शिक्षण विभाग, शासन अधिसूचना क्र.DBT-२०१७/प्र. क्र. २२/एसडी.५, दिनांक ३०/०६/२०१७.

प्रस्तावनाः-

राज्य शासनामार्फत शासकीय योजनांचा लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण करण्याकरीता Maha DBT portal सुरु करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या खालील पाच योजना DBT portal वर घेण्यात आल्या आहेत. सदर योजना महाराष्ट्र आधार अधिनियम, २०१६ मधील कलम (३) अनुसार दिनांक ३० जून, २०१७ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

१. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती (सद्यःस्थितीत उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५वी स्तर) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी स्तर) (एकूण ४ लेखाशीर्षाखाली ही शिष्यवृत्ती देण्यात येते.)
२. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील गुणवत्ता शिष्यवृत्ती.
३. ज्युनिअर कॉलेज साठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.
४. संस्कृत शिष्यवृत्ती.
५. उपस्थिती भत्ता

सद्य:स्थितीत महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ अंतर्गत संदर्भाधिन क्र. १ येथील अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाकडून देण्यात येणारे कोणतेही अर्थसहाय्य, वित्तीय लाभ व सेवाच्या प्रयोजनार्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन करुन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करुन त्या आधारे लाभार्थ्यांस थेट त्यांच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात लाभाची रक्कम जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणा-या पाच योजना संदर्भ क्र. २ येथील अधिसूचनेन्वये अधिसूचित केलेल्या आहेत. सदर योजनांच्या लाभार्थी विद्यार्थ्यांची वित्तीय लाभाची रक्कम ही थेट लाभार्थ्यांस त्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मधील कलम (३) अनुसार अधिसूचित केलेल्या शालेय शिक्षण विभागाच्या उपरोक्त नमूद केलेल्या पाच योजनांतर्गत पात्र झालेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ या वर्षापासून वित्तीय लाभाची रक्कम प्राप्त करुन घेण्याकरीता त्यांचा आधार क्रमांक पुरावा म्हणून सादर करणे आवश्यक राहील तसेच आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न करावा लागेल व त्यानुसार योजनेंतर्गत देय वित्तीय लाभाची रक्कम ही लाभार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात थेट जमा करण्यात यावी. DBT पोर्टलवर अधिसूचित झालेल्या शालेय शिक्षण विभागाच्या योजना व लेखाशीर्षाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	योजनांची नावे ,अर्थसहाय्य ,वित्तीय लाभ आणि सेवा
१	**माध्यमिक शाळांना शिष्यवृत्त्या (४ लेखाशीर्ष)** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम ,१९६१यांच्या कलम १८२अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने.(उच्च माध्यमिक शाळा) (२२०२ २३१८)
	खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (पूर्व माध्यमिक शाळा) (२२०२ ०३५१)
	ग्रामिण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती (२२०२ ०३४२)
	प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना सहाय्य (२२०२ ०३८९)
२	कनिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्त्या (२२०२ ०३७१)
३	आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती (२२०२ १२५१)
४	संस्कृत शिक्षण -माध्यमिक शाळांमध्ये भारत सरकारची शिष्यवृत्ती (२२०२ १०६२)
५	समाजातील दुर्बल घटकांमधील मुलींना उपस्थिती भत्त्यासाठी जिल्हा परिषदांना अनुदाने (२२०२ ३६९१)

२. सदर प्रयोजनार्थ माहिती व तंत्रज्ञान केंद्रीभूत थेट लाभ हस्तांतरण प्रणाली (State DBT and Service Portal) विकसित करण्यात येत असून यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदर State DBT and Service Portal प्रणालीमार्फत प्रथम टप्प्यात उपरोक्त पाच योजना राबविण्याचे निश्चित झाले असून त्यानुसार सदर योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरीता अर्ज करण्यापासून ते रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यापर्यंत सर्व प्रक्रिया DBT portal मार्फत करणे अनिवार्य राहील. अनुक्रमांक १ ते ४ या योजनांसाठी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांच्या स्तरावर स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे तसेच अनुक्रमांक ५ या योजनेसाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांच्या स्तरावर स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे व अशा स्वतंत्र बँक खात्यामधूनच थेट लाभ देण्याविषयी कार्यवाही करण्यात यावी.

३. पात्र लाभार्थ्यांना अदा करण्यात येणा-या लाभाच्या रकमेची वितरण पद्धत संदर्भातील उपरोक्त बदल वगळता विषयांकित योजनांच्या प्रचलित शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेली अंमलबजावणीची उर्वरित सर्व कार्यपद्धती कायम राहील. त्यानुसार पात्र लाभार्थ्यांनी त्यांचा आधार क्रमांक हा ऑनलाईन अर्जासोबत

देणे आवश्यक असेल. तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त घ्यावयाची आहे असे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करुन घ्यावी.

४. उपरोक्त प्रमाणे आधार क्रमांक संलग्नित बँक खात्यावर लाभ देण्याबाबतची कार्यवाही करताना आधार क्रमांक,बँक खाते क्रमांक व त्यांच्याशी संबंधित कोणतीही वैयक्तिक स्वरुपाची माहिती जाहीरपणे प्रकाशित करु नये किंवा अशी माहिती ऑनलाईन प्रणालीद्वारे सहजरित्या उपलब्ध होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.लाभार्थ्यांना लाभ देण्यापुरताच अशा माहितीचा वापर करण्यात यावा,आणि या विषयी केंद्रीय आधार कायदा,२०१६ तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा,२००० व त्याखालील नियम २०११ मधील तरतुदीचे पालन करुन कार्यवाही करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७०९२११७३४१७७८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.09.21 17:24:19 +05'30'

(डॉ.सुवर्णा खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
२. मा.विरोधी पक्षनेता,(विधानसभा/विधानपरिषद), महाराष्ट्र राज्य
३. विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य
४. मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा.प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
६. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
११.सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.
१२.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद.
१३.शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१५.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१६.महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
२०. निवड धारिका एसडी.-५